INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# D.P. Bhosale College, Koregaon

Tal. Koregaon, Dist. Satara (MS), INDIA
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
**NAAC Re-accredited 'A' Grade (CGPA 3.12)**
**ISO 9001:2015 Certified**

Impact Factor – 6.261 | ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March -2019 Special Issue – 171 (B)




## आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद स्मरणिका
## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

**अतिथी संपादक**
डॉ.व्ही. एस. सावंत
प्राचार्य
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

**कार्यकारी संपादक**
डॉ. बी. एस. चव्हाण
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

**सहयोगी संपादक**
श्रीमती एम. एम. देठे
डॉ. व्ही. व्ही. नावडकर

**मुख्य संपादक**
डॉ. धनराज धनगर (येवला)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.261** **ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**March -2019 Special Issue – 171 (B)**

## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

**अतिथी संपादक**
डॉ.व्ही. एस. सावंत
**प्राचार्य**
**डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव**
**ता. कोरेगाव, जि. सातारा**

**कार्यकारी संपादक**
डॉ. बी. एस. चव्हाण
**प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग**
**डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव**
**ता. कोरेगाव, जि. सातारा**

**सहयोगी संपादक**
श्रीमती एम. एम. देठे
डॉ. व्ही. व्ही. नावडकर

**मुख्य संपादक**
डॉ. धनराज धनगर **(येवला)**

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**
For Details Visit To : **www.researchjourney.net**

**© All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 800/-**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | भटके आणि विमुक्त समाज : सर्वांगीण आयामांचे विचारमंथन | डॉ.सुवर्णा रावळ | 09 |
| 2 | 'बिराड' आत्मकथनातून आलेले बेलदारेत्तर भटक्या समाजाचे चित्रण | डॉ.प्रमोद गारोडे | 13 |
| 3 | नंदीवाले समाजातील जातपंचायत व महाजात पंचायत | डॉ.दत्ता पाटील | 25 |
| 4 | देशीवाद आणि दलित कविता | डॉ.पांडुरंग गायकवाड | 28 |
| 5 | भटक्या – विमुक्त गोंधळी समाजाचा अभ्यास | श्री.विलास देऊळकर | 35 |
| 6 | आदिवासी भटके यांची आत्मकथने | डॉ. शोभा रोकडे | 40 |
| 7 | भुजंग मेश्राम यांच्या काव्यातील वंचितांचे जीवनदर्शन | प्रा. संजय मेस्त्री | 45 |
| 8 | विमुक्त भटक्या जमाती : स्त्रियांच्या समस्या | प्रा. प्रदिप होडावडेकर | 51 |
| 9 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्रीजीवनाचे चित्रण | डॉ. अलका मटकर | 55 |
| 10 | 'गोठण'मधील गोर बंजारा संस्कृती | डॉ.गिरीश मोरे | 59 |
| 11 | भटक्या-विमुक्तांची ऐतिहासिक सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी | प्रा.वामन गावडे | 63 |
| 12 | भटक्या विमुक्तांच्यातील विवाह पद्धती (निवडक जातींच्या अनुषंगाने -गीसावी, नंदीवाले, फासेपारधी) | डॉ. नितीश सावंत | 67 |
| 13 | भटक्या विमुक्तांच्या कलाप्रकारांचे स्वरूप | डॉ. एन. डी. कार्वेकर | 72 |
| 14 | भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | डॉ. सौ. वंदना नढे | 76 |
| 15 | कैकाडी समाज आणि संस्कृती | डॉ. मिलिंद वाव्हळे | 80 |
| 16 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक दु:ख | पूजा कदम व आण्णासाहेब सोनवणे | 89 |
| 17 | भटक्या विमुक्त जमातींचे स्वरूप व वैशिष्ट्ये | प्रा.अभिमन्यू ओहळ | 92 |
| 18 | वंजारी समाजाचे अंतरंग | डॉ. अनिल बांगर | 96 |
| 19 | 'चिनी मातीतील दिवस' या प्रवासवर्णनातील सामाजिकता | प्रा.धनाजी उर्फ धनंजय भिसे | 101 |
| 20 | भटक्या समाजाचे साहित्यातील चित्रण | प्रा. आर. डी. शिंदे | 109 |
| 21 | भटक्या विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | डॉ. सुधाकर बोथीकर | 113 |
| 22 | राजर्षी शाहू महाराज यांनी भटक्या-विमुक्त जमातीच्या उद्धारासाठी केलेले सामाजिक कार्य | प्रा. अजितकुमार पाटील | 120 |
| 23 | 'फेसाटी'तील वंचिताच्या शिक्षण प्रवासाचा शोध | डॉ. आनंद वारके | 127 |
| 24 | पशुपालक भटक्या जमाती : समाज आणि संस्कृती | डॉ. हिराचंद्र मोरे | 133 |
| 25 | भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | डॉ. मीनाक्षी देव | 137 |
| 26 | कोल्हाट्याचे पोर-स्वरूप व विशेष | डॉ. नंदिनी रणखांबे | 141 |
| 27 | फँड्री : एक समाज वास्तवदर्शी चित्रण | अरुणा गायकवाड | 144 |
| 28 | भटक्या विमुक्तांच्या कादंबरीतील स्त्री जीवन | आशा घोडके | 148 |
| 29 | भटक्या जमातीची व्यथा मांडणारी आत्मकथने | ज्ञानेश्वर कदम | 153 |
| 30 | बंजारा समाज : साहित्य आणि संस्कृती | डॉ. राजेश धनजकर | 156 |
| 31 | भटक्या विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | डॉ. राजेंद्र बावळे | 161 |
| 32 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक व सांस्कृतिक स्थिती | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 165 |
| 33 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील समाज व अंधश्रद्धा | प्रा. बाळकृष्ण भोसले | 169 |
| 34 | 'बहादूर थापा आणि इतर कविता' : वंचित समूहाचे चित्रण | डॉ. उमेश सिरसट | 173 |
| 35 | 'भटके –विमुक्त' – संकल्पना स्वरूप व व्याप्ती | डॉ. विद्या नावडकर | 177 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# बंजारा समाज : साहित्य आणि संस्कृती

**डॉ. राजेश धनजकर**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड जि. परभणी

देशाच्या विविध भागात वास्तव्याला असलेली 'बंजारा' ही एक भटकी जमात. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, तामिळनाडू या राज्याच्या काही भागात ही जमात पसरलेली आहे. महाराष्ट्र राज्यात या जमातीचा समावेश 'विमुक्त जाती' त केला असून, ही जमात यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती, नांदेड या जिल्हयात बहुसंख्येने आढळते. परभणी, हिंगोली, धुळे, जळगाव, बीड, नागपूर, गडचिरोली, आदी जिल्हयांमध्येही कमी अधिक प्रमाणात ही जमात आहे. बंजारा हा अतिशय मेहनती व कष्टाळू समाज. या देशातला मूळ निवासी. सतत भटकंती करून उदरनिर्वाह करणारा समाज. पूर्वी पशुपालन व मालाची ने आण करून पोटाची खळगी भरणारा हा समाज होता, परंतु अलीकडे तो स्थिर होऊ पहात आहे.

"बंजारा, बनजारे, बनजारा, वनजारा, बनजारी,ब्रिजारी, लमान, लमाणी, लभाण, लभाणी, लंबाडा, लबन, बाळदिया, लदेणीया, गवारीया, गवार, गवारी, सिंगाडे, बंजारी अशा विविध नावांनी हा लोकसमूह ओळखला जातो".[१] असा हा समाज वेगवेगळया प्रदेशात विविध नावांनी ओळखला जात असला, तरी त्यांच्या 'संस्कृती' त फारसी भिन्नता नाही. पण त्यांच्या मूळ स्थानाबद्दल मात्र भिन्नता दिसून येते. प्रा. मोतीराम राठोड यांनी त्यांच्या 'पाल निवासी भटक्या जमाती' या ग्रंथात 'बंजारा जमातीचे मूळ स्थान मध्यभारत असावे' (पृ.५६) असे म्हटले, तर प्रा. रामनाथ चव्हाण यांनी 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग' नावाच्या ग्रंथात "लमाण हा समाज मूळचा आंध्रप्रदेशातील ओतापेठ, महेबुब, एगंटापूर, महमदाबाद, तोपारगी, कोयलकोंडा अशा विविध भागातून आलेला त्या काळच्या मुस्लीम धर्मांतराच्या भीतीने आंध्रातून परागंदा झालेला असा समाज आहे. त्यांची मूळ भाषा तेलगू असली तरी 'लमाणी' नावाची स्वतंत्र भाषा असल्याचे ते सांगतात".[२]

RESEARCH JOURNEY

प्रा.डॉ. एस.जी. देवगावकर यांनी 'महाराष्ट्रातील निवडक जाती -जमाती' या ग्रंथात, बंजारा समाजाच्या मूळ निवासाचा प्रदेश राजस्थान ठरवला आहे. (पृ. ४३०) अजून एक असं की, बंजारा जमातीच्या लोकजीवनात एक पांरपरिक लोकगीत आहे. हे लोकगीत बंजारा जमातीला सिंधू संस्कृतीपर्यंत घेऊन जाते. ते असे

**" सिंधू नदीरे पाळेम ।**
**सप्त सिंधूरे राळेम ।**
**आर्य दामडिया ।**
**दामड लगागेरे ।**
**मार सेनानायक ।।**

आर्यांना सिंधू संस्कृतीत वास्तव्यात असलेल्या बंजारा जमातीची घरदारे जाळून कशी बेचिराख केली याचे वर्णन या लोकगीतात आले आहे".[३] खरे तर, बंजारा समाजातील लेखक, विचारवंत, व संशोधकांनीच या जमातीच्या मूळ स्थानाचा शोध घेऊन नव्याने मांडणी करावी असे वाटते.

श्रीमती इरावती कर्वे यांनी 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात, "मराठी जातीचे डोके, चेहरे पट्टी व नाकाची लांबी रूंदी आदी मोजमाप करून लोकांची जातवार व विभागावर यादी दिली. यात 'वंजारी किंवा बंजारी' जमातीचा समावेश त्यांनी 'लहान डोकीचा घेर' मध्ये केला आहे. (अधिक माहितीसाठी प्रा.डॉ. शैलजा देवगांवकर 'वैदर्भीय आदिवासी जीवन व संस्कृती पृ.१४६ पहावे') वंशशास्त्रदृष्टया बंजारा समाजाची मापे पुढील प्रमाणे.
(घेराचे प्रमाण ५२६ ते ५३२ मिलिमिटर)

डोक्याचा घेर मिलिमिटर - ५३०.४५
डोक्याचे सापेक्ष प्रमाण - ७७.२६
नाकाच्या उंचीचे प्रमाण - १७७.४६
नाकाच्या लांबी - रूंदीचे सापेक्ष प्रमाण - ७४.२७
वरच्या जबड्याच्या लांबीचे प्रमाण - ४६.८६
चेहरा व डोके हयांच्या रूंदीचे प्रमाण - ९४.०८"[४]

साधारण बंजारा जमातीचे लोक उंच असून, पुरूषांची उंची साडेपाच ते सहा फूट व स्त्रियांची उंची पाच ते साडेपाच फूट असल्याची दिसते. स्त्री-पुरूष रंगाने गोरे असून, दोघांचीही शरीरयष्टी मजबूत असते.

बंजारा समाजाच्या निवास किंवा वस्तीला 'तांडा' म्हणतात, तर तांडयाच्या प्रमुखास 'नाईक' म्हटले जात असे. आज तांडयातला प्रत्येकच माणूस नाईक बनला आहे. पूर्वी नाईक हाच तांडयाचा सर्व कारभार सांभाळत असे. तांडयात झालेले भांडण-तंटे व वाद नाईक आणि तांडयातील प्रमुख व्यक्ती मिळून समोपचाराने मिटवत असत. "तांडा हे एका वर्तुळाबाहेरच्या संस्कृतीचे नाव आहे. या संस्कृतीचा संबंध रानाशी आहे. रानातील पशु-पक्ष्यांशी डोंगरदऱ्यांशी आहे. मागल्या हजारो वर्षापासून तांडयाचे तांडापण संपले नाही. त्यांची भटकंतीही संपली नाही आणि वाट्याला आलेले दारिद्रय व अंधश्रध्दाही तशीच आहे".[५]

निसर्गाच्या सानिध्यात राहणारा व पशु-पक्ष्यांशी जवळीकतेचं नातं सांगणारा हा समाज निसर्गवादी आहे. त्यांच्या 'तांडा' नावाच्या प्राचीन संस्कृतीने बोलीभाषा, पेहराव, चालीरिती, सणोत्सव, नृत्यगीते, प्रथा आणि परंपरा जीवापाड जोपासून ठेवल्या आहेत. मौखिक परंपरेने जोपासलेली बंजारा बोलीतील अनेक गीते आजही तांडयावर ऐकायला मिळतात. याच तांडयाच्या संदर्भात आत्माराम राठोड म्हणतात, "मला जन्मगाव नाही, पण मी ज्या गावात जन्माला आलो त्या गावाच्या वस्तीला 'तांडा' असे म्हणतात".[६] प्रा. प्रकाश राठोड यांनी मात्र पूर्वीचा 'तांडा' आणि आजच्या तांडयाचं बदललेलं स्वरूप पाहून खंत व्यक्त केली. ते म्हणतात. " बंजारा जमातीत शिकलेल्या वर्गाचा उदय होण्यापूर्वी उपासतापास, होमहवन, वाटसावित्री, गौरीपूजा, हळदीकुंकू या गोष्टी तांडयात नव्हत्या. त्यावेळच्या तांडयात आसाराम बापूचे व बुवा -बाबांचे भक्त नव्हते. तर संतश्रेष्ठ सेवालाल महाराजांची भक्ती करणारे डोळस अनुयायीच केवळ त्यावेळच्या तांडयात होते".[७] बंजारा समाजासाठी ही फार मोठी धोक्याची घंटा आहे. त्यांच्या प्रगतीला ठरणारा अडसर आहे, हे समाजाने आता तरी घ्यानात घ्यावे आणि आपली पुढील वाटचाल करावी.

बंजारा समाजात जन्माला आलेले एक महान व क्रांतीकारी संत म्हणून सेवालाल महाराज ओळखले जातात. आंध्रप्रदेशातील गोलाल डोडी हे त्यांचं जन्मगांव. १५ फेब्रुवारी १७३९ रोजी त्यांचा गोलाल डोडी तांडयात जन्म झाला. संत सेवालाल महाराज यांचा माणसाच्या कर्तृत्वावर विश्वास होता. परिवर्तनवादी व बुध्दीवादी विचारांचे ते तांडयातले पहिले महापुरूष. संबंध बंजारा समाजाला मार्गदर्शन करताना ते नेहमी म्हणायचे-

**" तम सोता तमारे जीवणेम दिवो लगा सको चो ।**
**कोयी केनी भजो, पूजो मत, कोयी केती कम छेनी ।**
**सोतार वोळक सोता कर लिजो ।**
**भजनेम वेळ घालो मत; करणी करेर सिको ।**
**मारी सिकवाडी पर धेन दिजो ।**
**जाणजो, छाणजो, पचज माणजो ।।**

आपण स्वतः आयल्या आयुष्यात दिवा लावू शकतो. कोणी कोणाला भजू-पूजू नका. कोणी कोणापेक्षा कमी नाही. स्वतःची ओळख स्वतःच करून घ्या. भजनात वेळ घालवण्यापेक्षा कृती करणे शिका. माझ्या या शिकवणुकीवर लक्ष्य द्या. आधी जाणून घ्या. मग छाननी करा आणि नंतरच स्वीकारा".[८]

मुळात बंजारा हा आदिम समाज. हजारो वर्षे या समाजाने रानोमाळ भटकंती करून आपला उदरनिर्वाह भागविला. आज काही प्रमाणात हा समाज स्थिर झाला असला, तरी अजूनही या समाजाच्या 'तांडया' वर अमाप दारिद्रय आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, आणि व्यसनाधीनतेचा विळखा दिवसेंदिवस घट्ट आवळला जात आहे. भूमिहीनांची संख्या म्हणावी तर तिही कमी नाही. मोलमजुरी करणे, तेंदुपत्ता विकणे, ऊस तोडणीच्या कामाला जाणे व दारू गाळणे हे बंजारा समाजाच्या जगण्याचे साधनं बनलेत. ऊस तोडणीच्या फडात, सहज नजर टाकल्यास पन्नास टक्के बंजारा समाज दृष्टीस पडतो.

एकेकाळी गाई-गुरांच्या पाठीवरून खजूर, मीठ, नारळ, तांदूळ वाहून नेणारी जमात आज मीठ -मिरचीसाठी भटकंती करताना दिसते. गावशिवारात मजुरी नाही मिळाली, तर ऊस तोडणीचा रस्ता पकडते. आणि म्हणूनच तर आज तांडे ओस पडू लागलेत. "मिठाचा आणि गव्हाचा व्यापार करणारी प्रसिध्द जमात म्हणून 'बंजारा' समाज ओळखला जात असे".[९] पूर्वी व्यापारात अग्रेसर असलेल्या जमातीकडे आज कुठलेही व्यापाराचे साधन नाही. भलेही इंग्रजाच्या काळात त्यांच्या व्यापाराला ओहोटी आली असेल, परंतु आज बंजारा समाजाकडे व्यापार करणारी जमात म्हणून कुणीही पहात नाही. यासंदर्भात आत्माराम राठोड यांचे मत फार महत्वाचे वाटते. ते म्हणतात, " बंजारा हा संपूर्ण समाज व्यापारात कधी पडलाच नव्हता ...हा समाज व्यापार बुडाल्याने दुर्गती पावलेला आहे, असे मुळीच आढळत नाही. याचे कारण असे की, हा समाज व्यापारात असा प्रवृत्त झालाच नव्हता. त्यांच्या उपजिविकेचे एकमेव साधन केवळ मालाची ने-आण करणे हे होते. गाई -गुरांच्या पाठीवरून मालाची ने-आण करणाऱ्या या अवस्थेला ते 'लदेणी' असे म्हणत. अशी लदेणी म्हणजे व्यापार नव्हे. ती मालाची ने-आण होय".[१०]

डॉ. इरावती कर्वे यांनी 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात, बंजारा समाजाचा वंशपंरपरा धंदा म्हणजे बैलावर माल (मुख्यत्वे धान्य, नारळ,मसाल्याचे पदार्थ, खजूर वगैरे) लादून देशादेशी तो नेऊन पोहचवायचा. मोगल राजांच्या काळात निरनिराळया फौजांना धान्य पुरविणारे ते मक्तेदार होते. (पृ.१२३) याचाच अर्थ असा की, बंजारा ही भटकी जमात पूर्वीच्या काळी फक्त मालाची ने-आण करणारी जमात होती. आणि त्यावरूनच या समाजात 'लदेणी' हा शब्द रूढ झाला असावा.

बंजारा समाजात साजरे केले जाणारे सणोत्सव (त्यातल्या-त्यात होळी, तीज त्योहार, गोदम पूजन, लेंगी) आचार -विचार, गीत, नृत्य, संगीत (तेही ओबडधोबड) विशिष्ट वेशभूषा, स्वतंत्र बोलीभाषा, विधी आदिंमधून त्यांच्या 'संस्कृती' चा प्रत्यय येतो. आज संबंध देशभरचा बंजारा समाज 'बंजारी बोली' बोलतो. त्यांचं लोकसाहित्यही बंजारी बोलीतच उपलब्ध आहे. असे असले तरी त्यांच्या बोलीला लिपी नाही. अलीकडच्या काळात बंजारा समाजाचा शहरी संस्कृतीशी संबंध येऊ लागला. त्यामुळे शहरी भाषा व संस्कृतीचे नकळत त्यांच्याकडून अनुकरण होत आहे, आणि ते अपरिहार्य आहे. परंतु या समाजाने स्वभाषेचा व संस्कृतीचा विसर पडू देता कामा नये. हल्लीच्या काळात बंजाराच काय, सर्वच बहुजनांना शहरी संस्कृती श्रेष्ठ व आपली संस्कृती कनिष्ठ वाटू लागली. बंजारा माणूस समोरासमोर आल्यास 'जय सेवालाल' म्हणण्याऐवजी तो 'रामराम' घालू लागला. बंजारा बोलीत संवाद साधण्याऐवजी त्यांनी आता मराठीत बोलण्याचा धुमधडाका लावला. तांडयातील बोली आणि पारंपरिक पेहराव त्याला आता नकोसा वाटत आहे, आणि हेच संस्कृतीच्या ऱ्हासाचं मूलभूत कारण आहे. भाषा टिकली तरच संस्कृती टिकेल, अन्यथा हजारो वर्षाची परंपरा असलेली संस्कृती लयाला जाईल. तिचं जतन व संवर्धन करायचं असेल, तर संबंध बंजारा समाजानेच आपल्या बोलीत संभाषण करायला हवे. तेव्हाच त्यांची भाषा जिवंत राहील.

"बंजारा ही मराठीची वैशिष्टपूर्ण बोली आहे. महाराष्ट्राच्या विदर्भ प्रांतात ही बोलली जाते. या बोलीचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे या बोलीवर हिंदी व गुजरातीचा प्रभाव आहे".[११] मुळात बंजारा हा समाज असून, 'बंजारी' किंवा 'लमाणी' ही त्यांची स्वतंत्र बोलीभाषा आहे. पण ती मराठीची बोली नाही. दुसरे असे की, बंजारा समाज जी बोली बोलतो, ती केवळ विदर्भ प्रांतातच बोलली जाते असे नव्हे, तर ती संबंध देशभर बोलली जाते.

महाराष्ट्रातील तमाम बंजारा समाजाची बोली व त्या बोलीतील शब्द हे मराठी भाषेतील शब्दांपेक्षा सर्वस्वी निराळे आहेत. जसे - बाटी (भाकर), देनाक (देऊन टाक), केल्डा (गोऱ्हा), पीसा (पैसे),सोगी (झोपली), धांस (पळून जा), कणा आईस (केव्हा येशील), याडी (आई), बा (बापू/बाबा), तारे (तुझा), रीस (राग), कीम (कुठे), मारो (माझा), छोरा (मुलगा), साठा (ऊस), तांड्री (बायको), इ.

**बंजारा भाषेतील काही वाक्य व त्यांचा मराठीत अर्थ -**

| | |
|---|---|
| तारो नाम काई छ - | तुझे नाव काय आहे ? |
| तू कना आईस - | तू केव्हा येशील ? |
| इ मारो घर छ - | हे माझे घर आहे. |
| मारो घणो काम छ - | माझं खूप काम आहे. |
| तोन कतरा छोरा छ - | तुला किती मुले आहेत? |

रोजच्या जीवनात बंजारा समाज वरील स्वरूपाच्या शब्दांचा व वाक्यांचा उपयोग आपल्या बोलीभाषेत करताना दिसतो.

बंजारा हा हिंदू संस्कृतीच्या बाहेरचा समाज. त्यांची स्वतंत्र तांडा संस्कृती. पेहराव आणि बोलीभाषा हिंदूपेक्षा वेगळी. वर्णाश्रमाच्या चौकटीत न बसणारा व नैसर्गिक जीवन जगणारा हा जंगलचा राजा. निसर्ग हाच त्यांचा सखा व सोबती असताना, आज मात्र हा समाज हिंदूधर्माच्या कचाटयात सापडला आहे. हिंदूच्या अनेक देव-देवता बंजारा समाजाच्या देव्हाऱ्यावर आरूढ झाल्या. अगदी अलीकडे तर, तांडया-तांडयात भजन -कीर्तनाचं अमाप पीक येऊ लागलं. कर्मवादाला प्राधान्य देण्याऐवजी समाज दैववादाला कवटाळताना दिसतो. ही समाजासाठी अतिशय चिंतेची बाब आहे. तसं पाहिलं तर, इतर भटक्या समाजाच्या तुलनेत महाराष्ट्रात तरी बंजारा समाजाला सक्षम अशा प्रकारचं राजकीय नेतृत्व लाभलं आमदार, खासदार, राज्यमंत्री ते मुख्यमंत्री असा राजकीय वारसा या समाजाकडे आहे. स्व. वसंतराव नाईक, स्व. सुधाकरराव नाईक (मा.मुख्यमंत्री), मनोहरराव नाईक (मंत्री) हरिभाऊ राठोड (खासदार) संजय राठोड (राज्यमंत्री) अशी राजकीय परंपरा या समाजाला लाभली असली, तरी या पंरपरेचा पूर तांडयापर्यंत गेला नाही, ही खेदाची बाब आहे.

अगदी अलीकडच्या काळात बंजारा समाजात शिक्षणाचं प्रमाण बऱ्यापैकी वाढत आहे. राजकीय क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात या समाजाचा शिरकाव होत आहे. डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, तहसिलदार, पोलीस अधिकारी, यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. १९६० नंतर बंजारा समाजातून नव्यानेच लेखक वर्ग पुढे आला. समाजातल्या असंख्य प्रश्नांवर आता तोही लिहू लागला. कथा, कविता, चरित्र, आत्मचरित्र, लोकसाहित्य, वैचारिक लेख या वाङ्मय प्रकारात लिहिता झाला. समाजाचं दुःख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, जादूटोणा, व्यसनाधीनता आदी विषयांवर तो पोटतिडकिने लिहीत आहे. तांडा संस्कृती, भटक्या विमुक्तांचा जाहिरनामा, गोरमाटी, गोर बंजारा वंशाचा इतिहास, पाल निवासी भटक्या जमाती (प्रा. मोतीराम राठोड), बंजारा लोकजीवन पध्दती (डॉ. रूक्मिणी पवार), गोर बंजारा इतिहास व लोकजीवन, तांडा (आत्माराम राठोड), याडी (पंजाब चव्हाण), गोरमाटी संस्कृती व संकेत (मोहन नाईक), बंजारा समाज साहित्य आणि संस्कृती (प्रा. प्रकाश राठोड), बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते (डॉ. सुनिल राठोड), डॉ. भाऊसाहेब राठोड, कवी वीरा राठोड, डॉ. रमेश जाधव, डॉ. राजाराम जाधव, ग.ह. राठोड, डॉ.गणपत राठोड, डॉ.के.के. जाधव डॉ. प्रकाश चव्हाण, डॉ. परमेश्वर पवार, डॉ. रामराव चव्हाण, डॉ. पी.एल.चव्हाण अशी अजूनही बरीच लेखक

मंडळीची यादी वाढू शकते. तुर्तास मी एवढेच म्हणेण की, भविष्यात बंजारा साहित्यिकांकडून सर्जनशील साहित्य निर्माण व्हावे. साहित्यिकांनी समाजाला नवा विचार व नवी दृष्टी प्राप्त करून दिली, तर समाज परिवर्तनाच्या दिशेने नक्कीच वाटचाल करू शकेल, यात तिळमात्र शंका नाही.

**संदर्भ :-**

१. डॉ. सुनील राठोड 'बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते' पृ. १९
२. प्रा. रामनाथ चव्हाण 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग' पृ. २६
३. प्रा. प्रकाश राठोड 'बंजारा समाज साहित्य आणि संस्कृती' पृ. १७
४. इरावती कर्वे 'मराठी लोकांची संस्कृती' पृ .१३३
५. डॉ. रूक्मिणी पवार 'बंजारा लोकजीवन पध्दती' पृ.३५
६. डॉ.सुनील राठोड ' बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते' पृ. १६
७. प्रा. प्रकाश राठोड 'बंजारा समाज साहित्य आणि संस्कृती' पृ. २३
८. तत्रैव, पृ १९
९. डॉ. रूक्मिणी पवार 'बंजारा लोकजीवन पध्दती' पृ.३५
१०. डॉ. सुनील राठोड 'बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते' पृ. १७
११. प्रा. विनय हातोले 'अजंता' इंटरनॅशनल जर्नल मार्च - २०१९ पृ. ८५